दारुड्या पित्याची मुलाने केली हत्या
अक्षय तृतीयेला हादरला बुलढाणा जिल्हा! >> पान 2

विविध योजनांमधील गैरप्रकाराची चौकशी करुन लाभ द्या >> पान 3

अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर भेंडवळची घटमांडणी भाकिताकडे लागले लक्ष >> पान 4

**सुविचार**
प्रत्येक दिवशी नवीन सुरुवात करा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 258 ■ गुरूवार, दि. 01 मे 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





# जातनिहाय जनगणना करणार

**नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटकल अफेअर्सच्या बैठकीत मोठा निर्णय घेतला गेला आहे. गेल्या काही वर्षांपासून देशभर चर्चेत असलेल्या जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेण्यात आला आहे. मोदी सरकारनं येत्या काळात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयासंदर्भातील माहिती दिली. जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाचं स्वागत काँग्रेसकडून देखील करण्यात आलं आहे.**

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय

भारतात दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. २०२१ ला जनगणना होणं अपेक्षित होतं, मात्र त्यावेळी करोना संसर्गामुळं जनगणना करण्यात आली नव्हती. आता यापुढं जी जनगणना होईल ती जातनिहाय जनगणना असेल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती देताना जातनिहाय जनगणनेसंदर्भातील माहिती देताना काँग्रेसवर देखील टीका केली. काँग्रेसनं केवळ सर्वेक्षण करुन घेतल्याचं म्हटलं आहे.



केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव काय म्हणाले?

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटिकल अफेअर्सच्या बैठकीत जातींच्या गणनेचा आगामी जनगणनांमध्ये समावेश केला जाईल, अशी माहिती केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा हा मोठा निर्णय मानला जात आहे.

अश्विनी वैष्णव म्हणाले की, १९४७ नंतर जातनिहाय जनगणना करण्यात आली नाही. काँग्रेसनं जातनिहाय जनगणनेऐवजी जातनिहाय सर्वेक्षण केलं. यूपीए सरकारच्या काळात काही राज्यांनी राजकीय दृष्टीकोनातून जातनिहाय सर्वेक्षण केल्याचं ते म्हणाले.

जातनिहाय जनगणना मूळ जनगणनेत समाविष्ट झाली पाहिजे. नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट अफेअर्सच्या बैठकीत जात निहाय जनगणनेला आगामी काळातील जनगणनेत समाविष्ट केलं जाईल. जातनिहाय जनगणना काँग्रेस आणि इंडिया आघाडी आपल्या लाभापर्यंत मर्यादित ठेवत होत, असंही केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे.

प्रकाश आंबेडकर काय म्हणाले?



सुप्रीम कोर्टात या सरकारनं जातनिहाय जनगणना करु शकत नाही असं प्रतिज्ञापत्र सादर केलं होतं. आता कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटिकल अफेअर्सच्या बैठकीत जातनिहाय जनगणना करु असं म्हणत आहेत. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर हा निर्णय घेतला गेला आहे, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ काय म्हणाले?

केंद्र सरकारनं जर हा निर्णय घेतला असेल तर स्वागत आहे. हा निर्णय प्रचाराच्या पातळीवर न राहता त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. यासोबत आरक्षणाची मर्यादा वाढवण्यात यावी, अशी मागणी देखील हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. संघानं आगामी काळात त्यांचा सरसंघचालक ओबीसी समाजातील करावा, असं देखील हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. सर्वांचा समावेश व्यवस्थेत असावा ही भूमिका आणि भावना आहे, असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## राष्ट्रध्वजाच्या योग्य वापराबाबत आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन, गृहविभाग यांचेकडील परिपत्रक क्रमांक ०११२/२८७//प्र.क्र.७८/विशा/१अ/दि. १ जानेवारी २०१५ अन्वये प्लास्टकि व कागदी राष्ट्रध्वजांचा वापर थांबविण्यासाठी जनजागृती करण्याकरिता जिल्हाधिकारी यांनी जिल्हा व तालुका पातळीवर समित्या स्थापन कराव्यात असे सूचित केले आहे.



त्या अनुषंगाने मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी जिल्हा स्तरावर व अंधेरी, बोरीवली तसेच कुर्ला (मुलुंड) या तीन तालुक्यांसाठी तालुका स्तरावर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाच्या आदेशानुसार समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

२६ जानेवारी, १५ ऑगस्ट, १ मे व इतर राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा सामन्याच्यावेळी कार्यक्रम पार पडल्यानंतर खराब तसेच कार्यक्रमाच्या आणि अन्य ठिकाणी इतस्ततः पडलेले राष्ट्रध्वज गोळा करुन ते तहसील कार्यालयात व जिल्हा स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या यंत्रणेस सुपूर्द करण्याचे अधिकार अशासकीय संस्था तसेच इतर संघटना यांना शासन आदेश दि. १ जानेवारी २०१५ अन्वये सुपुर्द करण्यात आलेले आहेत, असे मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात 'दीनदयाल उपाध्याय अध्यासन' स्थापन करण्यात येणार –राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची घोषणा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी साम्यवाद व भांडवलशाही यांचा सुवर्णमध्य साधत एकात्म मानवतावादाचा सिद्धांत मांडला होता. दीनदयाल उपाध्याय यांचे विचार युवकांमध्ये पोहोचवण्यासाठी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात 'दीनदयाल उपाध्याय अध्यासन' स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती सी पी राधाकृष्णन यांनी केली.



पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मुंबईतील रुईया महाविद्यालयात दिनांक २२ ते २५ एप्रिल १९६५ या कालावधीत 'एकात्म मानवतावाद' या विषयावर व्याख्याने दिली होती. या व्याख्यानमालेच्या हीरक महोत्सवानिमित्त रुईया महाविद्यालय येथे आयोजित चर्चासत्राला राज्यपाल श्री.राधाकृष्णन यांनी संबोधित केले. कार्यक्रमाला केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल, कौशल्य व रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सुरेश सोनी, दीनदयाल शोध संस्थेचे सरचिटणीस अतुल जैन, विविध विद्यापीठांचे कुलगुरु उपस्थित होते.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन म्हणाले, साधी राहणी व उच्च विचारसरणी असलेल्या उपाध्याय यांच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे कार्य माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी केले. तसेच सध्याच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील या कार्याला पुढे घेऊन जात आहेत. ग्रामीण भागात रस्ते, गरिबांना गॅस कनेक्शन, पेयजल या योजना त्याचाच परिपाक आहेत. कोरोना काळात पाश्चात्य देशांनी लस शोधली असती तर तिची किंमत जनतेच्या आवाक्यात राहिली नसती. मात्र, भारताने संपूर्ण देशवासियांना मोफत कोरोना प्रतिबंधक लस दिली आणि त्यापलीकडे जाऊन अनेक देशांना मोफत लस उपलब्ध करुन दिली. हा सर्वसमावेशक विचार पंतप्रधान श्री. मोदी यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्याकडूनच अंगिकारला आहे, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.


वास्तवाचे भान ठेवून अन्न वाया जाऊ देऊ नये, प्रत्येकाने धन अर्जन करावे परंतु अनावश्यक खर्च करू नये तसेच स्वतःसाठी न जगता इतरांसाठीही जगावे हा दीनदयाल उपाध्याय यांचा विचार स्वीकारला पाहिजे, असेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

## राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत मुंबई 'वायएमसीए'चा १५० वा वर्धापन दिन साजरा

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्व धर्म-पंथातील लोकांसाठी खुल्या असणाऱ्या आणि देश, भाषा, धर्म, वर्ण यांच्या पलिकडे जाऊन कार्य करणाऱ्या यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएसन (वायएमसीए) या धर्मनिरपेक्ष संस्थेचे कार्य उल्लेखनीय आहे. आपल्या दीडशे वर्षांच्या प्रवासात या संस्थने चारित्र्यसंपन्न नागरिक, नैपूण्यपूर्ण खेळाडू आणि सामाजिक जाणिवा असलेली व्यक्तिमत्त्वे घडविली, असे गौरवोद्गार राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी काढले. राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत 'वायएमसीए' या संस्थेचा १५० वा वर्धापन दिन सोहळा शुक्रवारी (२५ एप्रिल) एनसीपीए सभागृह मुंबई येथे पार पडला. यावेळी संस्थेचे राष्ट्रीय महासचिव एन. व्ही. एल्डो, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस. राममूर्ती आणि बॉम्बे वायएमसीएचे सदस्य, आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. राज्यपाल सी पी राधाकृष्णन म्हणाले, वायएमसीए हॉस्टेलच्या माध्यमातून निवास व भोजनाची सुविधा निर्माण करुन दिल्यामुळे व्यापारी-उद्योजकांच्या जीवनात या संस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली.

## पहलगाम हल्ल्यानंतर मोदींचा मोठा निर्णय

### राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल, रॉ च्या माजी प्रमुखांवर मोठी जबाबदारी



नवी दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये अजूनही तणावाची परिस्थिती आहे. दरम्यान, भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल केले आहेत. माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्यासोबत मंडळात एकूण ७ सदस्य असतील. तिन्ही सैन्यातील निवृत्त अधिकाऱ्यांना बोर्डात समाविष्ट करण्यात आले आहे.

सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल केले आहेत आणि मंडळाची कमान माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांच्याकडे सोपवली आहे. माजी वेस्टर्न एअर कमांडर एअर मार्शल पीएम सिन्हा, माजी दक्षिणी आर्मी कमांडर लेफ्टनंट जनरल ए.के. सिंग आणि रिअर ॲडमिरल मोंटी खन्ना हे लष्करी सेवेतील निवृत्त अधिकारी आहेत. हे देखील मंडळाचा भाग असतील. राजीव रंजन वर्मा आणि मनमोहन सिंग हे भारतीय पोलिस सेवेतून निवृत्त झाले आहेत. बी व्यंकटेश वर्मा हे सात सदस्यांच्या मंडळावर निवृत्त परराष्ट्र सेवा अधिकारी आहेत.

आज (बुधवारी) पंतप्रधान मोदींनी चार प्रमुख बैठकांमध्ये भाग घेतला. त्यांनी सीसीएस, सीसीपीए, सीसीईए आणि मंत्रिमंडळाच्या बैठकांचे अध्यक्षपद भूषवले. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदींनी आतापर्यंत अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. यामुळे पाकिस्तान घाबरला आहे. पाकिस्तानने अलीकडेच रशिया, अमेरिका आणि तुर्कीशी चर्चा केली. त्यांनी संयुक्त राष्ट्रांना सांगितले की भारताचे आरोप निराधार आहेत.

भारतासोबत तणावपूर्ण परिस्थिती असूनही, पाकिस्तान आपल्या कारवाया थांबवत नाहीये. तो नियंत्रण रेषेवर सतत शस्त्रसंधीचे उल्लंघन करत आहे.


# देवेंद्र फडणवीसांच्या मर्जीतील अधिकारी म्हणून ओळख; आता मुंबई पोलीस आयुक्तपदी निवड

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** देवेन भारती यांच्याकडे मुंबई पोलीस आयुक्तपदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. ३५ वर्षे उल्लेखनीय सेवा बजावणारे विवेक फणसळकर आज मुंबई पोलीस आयुक्तपदावरून निवृत्त झाले. त्यानंतर विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्याकडे मुंबईत पोलीस आयुक्तपदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे.

कोण आहेत देवेन भारती?

भारती मूळचे बिहारमधील दरभंगा येथील आहेत. त्यांनी झारखंडमधून मॅट्रिक केले आणि दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून पदवी प्राप्त केली. त्यांनी मुंबईत डीसीपी, झोन ९ आणि डीसीपी गुन्हे शाखा म्हणून काम केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या मर्जीतील अधिकारी म्हणून देवेन



भारती यांची ओळख आहे. देवेन भारती हे १९९४ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. २०१४ ते २०१९ दरम्यान देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात मुंबईतील प्रभावी पोलीस अधिकारी होते. तेव्हा ते सहआयुक्त (कायदा व सुव्यवस्था) होते. त्यानंतर त्यांना अतिरिक्त पोलीस महासंचालक म्हणून बढती देऊन दहशतवाद विरोधी पथकात नेमण्यात आले. मग २०१९ मध्ये महाविकास आघाडी सरकारच्या काळात खझड अधिकार्यांसाठी सर्वांत कमी दर्जाची असाईन्मेंट समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र स्टेट सिक्युरिटी कॉर्पोरेशनचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालकदावरुन देवेन भारती यांना हटवण्यात आलं होतं. देवेन भारती यांनी मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या तपासासह अनेक मोठ्या गुन्ह्यांचा तपास केला आहे. महाविकास आघाडी सरकारने पदभार स्वीकारल्यानंतर त्यांची राज्य सुरक्षा महामंडळात अतिरिक्त महासंचालक म्हणून बदली करण्यात आली होती.

देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय–

देवेन भारती हे १९९४ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या जवळचे मानले जातात. फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांच्यावर पोलीस सहआयुक्त म्हणून कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी सोपवण्यात आली होती. त्यानंतर भारतींना अतिरिक्त पोलीस महासंचालकपदी बढती देऊन दहशतवादविरोधी पथकात पाठवण्यात आलं. मविआच्या काळात भारतींना साईड पोस्टिंग देण्यात आली.

त्यांना महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक बनवण्यात आलं होतं. डिसेंबर महिन्यात त्यांच्यावर सहपोलीस आयुक्त वाहतूक विभागाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. १९९४ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले देवेन भारती हे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय समजले जातात. वर्ष २०१४ ते २०१९ पर्यंत देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री असताना देवेन भारती हे पोलीस सहआयुक्त (कायदा आणि सुव्यवस्था) होते.

# दारुड्या पित्याची मुलाने केली हत्या अक्षय तृतीयेला हादरला बुलढाणा जिल्हा!

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बुलडाणा:** दारुड्या पित्याची सख्खा मुलाने निर्घृणपणे हत्या केल्याची खळबळजनक घटना आज बुधवारी सकाळी उघडकीस आली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील लोणी गुरव या गावात हा प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक मुहूर्त असलेल्या अक्षय तृतीयेला खामगाव तालुक्यासह बुलढाणा जिल्हा अक्षरशः हादरला आहे.

खामगाव तालुक्यातील लोणी गुरव येथे आज बुधवारी, ३० एप्रिल रोजी सकाळी हा खळबळजनक प्रकार उघडकीस आला असून गावकरी व नातेवाईक हादरले आहे. घटनेची माहिती मिळताच खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार व कर्मचारी घटना स्थळी दाखल झाले आहे. पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा यांना खामगाव ग्रामीणचे ठाणेदार यांनी घटनेची प्राथमिक माहिती दिली. त्या पाठोपाठ उप विभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील हे आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांसाह लोणी गुरव गावात दाखल झाले. आरोपी मुलास ताब्यात घेण्यात आले असून त्याची चौकशी करण्यात येत आहे. दरम्यान या घटनेचा विस्तृत तपशील इथे मिळू शकला नाही. मात्र घटनेची प्राथमिक माहिती पुढीलप्रमाणे आहे. गोरख हिवराळे ( वय पंचावण वर्षे, राहणार लोणी गुरव, तालुका खामगाव, जिल्हा बुलढाणा ) असे निर्घृणपणे



हत्या करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. ते आज बुधवारी सकाळी लोणी गुरव येथील राहत्या घरात अंथरुणावर मृता अवस्थेत आढळून आले. या घटनेची माहिती लोणी गुरव येथील पोलीस पाटील व अन्य नागरिकांनी खामगाव ग्रामीण पोलिसांना दिली. प्राथमिल चौकशीत गोरख हिवराळे याचा मुलगा धनंजय गोरख हिवराळे ( वय अंदाजे २५ वर्षे) यानेच पित्याची निर्घृण हत्या केल्याचे निष्पन्न झाले. गोरख हिवराळे



याला दारूचे व्यसन जडले होते. दारू ढोसून गोरख हा आपल्या पत्नीला दररोज मारहाण करायचा. आपल्या जन्मदात्या आईला दारुड्या बाप रोज मारतो याची आरोपी धनंजय ला चीड झाली होती. यामुळे त्याने बापाला कायमचे संपवायचे मनोमन ठरविले. काल मंगळवारी, २९ एप्रिल रोजी रात्री उशिरा धनंजय याने जाड लाकडी दांड्याने दारूच्या नशेत निपचित झोपलेल्या आपल्या बापावर लाकडी दांड्याने दणादण वार केले. यामुळे गोरखचा मृत्यू झाला. या निर्घृण हत्येने लोणी गुरव गाव हादरले असून गावावर शोक कळा पसरली आहे. गावात वरिष्ठ अधिकारी, विविध पथक दखल झाली आहे. यामुळे लोणी गुरव गावाला पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे...

## जागतिक कामगार दिन

१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधा न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या कायद्याने आठ तासांचा दिवस, लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी, महिला कामगारांच्या कामावर मर्यादा, रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम, कायद्याने साप्ताहिक सुट्टी, कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा, समान कामासाठी समान वेतन या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बॉंब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, '' कामगार – कामगारात, राष्ट्रा – राष्ट्रात, धर्मा – धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते.'' लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो! जगभरातील कामगारांना कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

## बसवेश्वर जयंती मिरवणुकीचा खर्च टाळून पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबीयांना मदत

### ढाणकी लिंगायत समाजाचा पुढाकार

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** दरवर्षी ढाणकी येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती ढोल ताशे बॅनर अन्नदान व गावातून भव्य मिरवणूक काढून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते परंतु पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या कुटुंबीयांना श्रद्धांजली अर्पण करून महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून यावर्षी अत्यंत साधेपणाने बसवेश्वर महाराज यांची जयंती बस्वलिंग स्वामी मठ ढाणकी येथे लिंगायत समाजाच्या वतीने साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर पहलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांना



श्रद्धांजली अर्पण करण्यात आली तसेच बसवेश्वर महाराज जयंती मिरवणुकीसाठी जमा करण्यात आलेली रक्कम यावेळी मिरवणूक न काढता व अनावशक खर्च न करता मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्याचा निर्णय ढाणकी येथील सकल लिंगायत समाजाच्या वतीने घेण्यात आला.

यावेळी गोविंद मिटकरे, अमोल तुपेकर, गजानन मिटकरे, बंन्सी मिटकरे, उमेश योगेवार, नागेश रातोळे, कांता चिंचोलकर, पप्पू जमदडे, सुभाष चिंचोलकर, संतोष सोनुने, बंटी वाळके, प्रशांत दिल्लेवार, महारुद्र बिबेकर, धनंजय मिटकरे, अशोक चिंचोलकर, विनोद हुडगे, गजानन गंजेवाड, उदय पुंडे, नागेश महाजन उपस्थित होते.

## अभिनेत्री नेहा मलिकच्या घरी चोरी; 'इतक्या' लाखांचे दागिने घेऊन मोलकरीण फरार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील प्रसिद्ध अभिनेत्री, मॉडेल आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर नेहा मलिक हिच्या घरी चोरी झाल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. नेहाच्या मुंबई येथील राहत्या घरी तब्बल ३४ लाख रुपयांचे मौल्यवान दागिने चोरीला गेले असून, या प्रकरणी तिच्या मोलकरीणीविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

ही चोरी शुक्रवारी घडली असून नेहाची आई मंजू मलिक या प्रार्थनेसाठी गुरुद्वारामध्ये गेल्या असताना, घरात मोलकरीण शहनाज शेख एकटीच होती. शनिवारी ती कामावर परतली नाही आणि वारंवार फोन करूनही प्रतिसाद न मिळाल्याने मंजू यांना संशय आला. त्यानंतर त्यांनी घरातील कपाटाची तपासणी केली आणि दागिने गायब असल्याचे लक्षात आले.

सीसीटीव्हीच्या आधारे पोलीस तपास सुरू :

मंजू मलिक यांनी आंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी भारतीय न्यायसंहितेच्या कलम ३८० अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून सध्या इमारतीतील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असून, आरोपी शहनाज शेख हिचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

मंजू यांनी पोलिसांना सांगितले की, त्या अनेकदा आपल्या बेडरुममधील लाकडी ड्रॉवरमध्ये मोलकरीणीसमोरच दागिने ठेवत असत. चोरी झाल्यानंतर शहनाजने कामावर येणे थांबवले आणि तिचा फोनही बंद आहे.

नेहा मलिक ही पंजाबी म्युझिक इंडस्ट्रीमधील प्रसिद्ध चेहरा असून, तिचे इन्स्टाग्रामवर चार दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स आहेत. ती तिच्या फॅशन, लाईफस्टाईल आणि ग्लॅमरस कंटेंटसाठी ओळखली जाते.

तिने विविध टीव्ही शोमध्येही सहभाग घेतला असून सोशल मीडियावर ती कायम सक्रिय असते. अशा वेळी तिच्या घरी झालेली चोरी ही तिच्या चाहत्यांसाठीही धक्कादायक घटना ठरली आहे.

## दृष्यमान शाश्वत स्वच्छतेसाठी प्रत्येकाचे योगदान महत्वाचे : पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पाटील

### ''कंपोस्ट खड्डा भरु, आपलं गाव स्वच्छ ठेवू मोहीम १ मे पासून

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ग्रामीण भागात वैयक्तिक स्वच्छतेसोबतच शाश्वत सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व पटवून देणे तसेच गावात दृष्यमान शाश्वत स्वच्छता राखणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामीण भागातील स्वच्छतेला अधिक गतीमान करण्यासाठी लोकसहभागावर भर दिला आहे. सार्वजनिक व घरगुती स्तरावरील घनकचऱ्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. त्याचा एक भाग म्हणून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा–२ अंतर्गत ''कंपोस्ट खड्डा भरु, आपलं गाव स्वच्छ ठेवू'' या मोहिमेची ग्रामीण भागात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. ही मोहीम दि. १ मे २०२५ ते दि. १५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ, बचतगट, युवक यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा, असे आवाहन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले आहे.



राज्यातील सर्व गावांमध्ये स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा– २ अंतर्गत वैयक्तिक शौचालय व सार्वजनिक शौचालयांसह घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, मैलागाळ व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, गोबरधन, या घटकांची कामे प्रगतीपथावर आहेत. राज्याच्या ग्रामीण भागात स्वच्छतेची लोकचळवळ उभी राहिल्यास या कामांना अधिक गती प्राप्त होईल. सर्व गावे हागणदारीमुक्त अधिक मॉडेल म्हणून घोषित करून संपुर्ण राज्य हागणदारीमुक्त अधिक मॉडेल करण्याचा शासनाचा संकल्प आहे.

अभियानाचे उद्दिष्टे : गावांची संपूर्ण स्वच्छता करण्याबरोबरच ग्रामीण भागातील सर्व गावांना दृष्यमान स्वच्छतेचा अपेक्षित दर्जा मिळवून ग्रामीण जनतेत स्वच्छतेविषयक वर्तणुकीत बदल घडवून आणणे, सेंद्रिय कचऱ्याचे व्यवस्थापन करून वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच शाश्वत सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व पटवून देणे. घनकचरा व्यवस्थापनात सुधारणा व पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यासाठी कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे. यावर भर देणे.

मोहीम अंमलबजावणी कालावधीचे टप्पे :–

अभियान कालावधी दि.०१ मे २०२५ ते दि. १५ सप्टेंबर २०२५

आरंभ महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दि.०१ मे, २०२५ रोजी.

गावातून कचरा जमा करून नाडेप भरण्याचा कालावधी: दि.०१ मे ते दि. १० मे २०२५.

प्रक्रिया, देखभाल व पडताळणी कालावधी: दि. ११ मे २०२५ ते दि. ३१ ऑगस्ट २०२५

नाडेप खड्डा उपसणे : दि. ०१ सप्टेंबर ते दि. १५ सप्टेंबर २०२५

लोकप्रतिनिधींचाही सक्रिय सहभाग

राज्यात या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता ग्रामस्थांप्रमाणे लोकप्रतिनिधी यांचाही सक्रिय सहभाग असणार आहे. सर्व जिल्ह्याचे पालकमंत्री, राज्यसभा सदस्य, लोकसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य, सरपंच यांना पाणीपुरवठा मंत्री श्री. पाटील, यांनी मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन पत्राव्दारे केले आहे. संबंधित लोकप्रतिनिधी आपल्या मतदारसंघात जाऊन मोहिमेचा आरंभ करणार आहेत.

मोहिम यशस्वी करण्याची जबाबदारी

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.), गटविकास अधिकारी, यांच्यावर मोहीम यशस्वी करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

गावपातळीवर मोहिमेत यांचा असेल सहभाग

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील सर्व अधिकारी/सल्लागार, विस्तार अधिकारी (सर्व), अन्य कर्मचारी, प्रत्येक ग्राम पंचायतीतील ग्राम सेवक, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, शिक्षक, ग्राम पंचायत स्तरावरील सर्व कर्मचारी तसेच ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक, सर्व महिला बचत गट यांचा सहभाग असेल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### जनगणना करण्याची काही गरज नव्हती मात्र, सरकारने चांगला निर्णय घेतला - मनोज जरांगे पाटील



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** केंद्र सरकारने आज संपूर्ण देशभरात जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय घेण्याची काही गरज नव्हती, मात्र केंद्र सरकारने हा जर निर्णय घेतला असेल तर घेऊ द्या, कारण इंग्रजी जनगणना केली होती त्या नंतर जनगणना झाली नाहीच. या जनगणनेमुळे आमच्या समाजाला न्याय मिळेल,ओबीसी ने जातीचे आरक्षण खाल्ले होते ते आता उघडे पडले आहे. कोणी किती खाल्ले ते समजेल. जनगणना करणे आवश्यक नाही, सरकारने बार्टी आयोगाचा शिफारसी जरी मंजूर केल्या, तरी भागते सरकारची इच्छा असेल तर नक्की करा. आमचा काही विरोध करण्याची गरज नाही, मात्र यात निष्पक्ष अधिकारी असले पाहिजे. बळजबरी नोंदी करणारे नसावे जाती वादी अधिकारी नसावे. जनगणना करतान कोणते ही जाती भेध करता कामा नाही, व आता आरक्षणाच कोठा सरकारने वाढवला पाहिजे. आयोग निवडतानी चांगले अधिकारी निवडा. असा सरकारला सल्ला देत केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाची मनोज जरांगे पाटील यांनी स्वागत करत जाहीर पाठिंबा दिला आहे.

### जेष्ठ गायिका आशा भोसले यांनी घेतले श्री. स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी अक्कलकोटच्या श्री. स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेतले तसेच मंदिरात श्री. स्वामी समर्थ महाराजांचा नाम जप देखील केला. यावेळी मंदिर समितीच्यावतीने प्रथमेश इंगळे यांनी त्यांचा श्री. स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला.यावेळी मंत्री आशिष शेलार आणि भोसले परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती.

### सुंदर असल्याचा फायदा घेऊन फिजा इराणी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विकते एमडी ड्रग




दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** दिसायला सुंदर असल्याने ती याची संधी घेते. कल्याणमध्ये स्कूटीवर फिरून तरुणांना एमडी ड्रग विकते. कल्याणच्या डीसीपी स्का'डने फिजा इराणीला जवळपास दोन लाखाच्या एमडी ड्रग सोबत अटक केली आहे. फिजा या आधी तीन वेळा अटक झाली आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये फिजा खूप फेमस आहे. इतकेच नाही तर कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागात ती एमडी ड्रग सप्लाय करते. पोलिसांनी आत्ता तरी फिजा विरोधात ठोस कारवाई केली पाहिजे अशी मागणी नागरीकांकडून होत आहे.

# विविध योजनांमधील गैरप्रकाराची चौकशी करून लाभ द्या

## गटविकास अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे मागणी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**लोणार :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व रोजगार हमी योजना मधून विहिरींचा लाभ मिळवून देण्यासाठी शेतकयांकडून संबंधीत अधिकारी व कंत्राटी कर्मचारी यांनी देवाण-घेवाण करत लाभ मिळवू दिला त्याची चौकशी करावी, तसेच २०२३ पासून २०२५ पर्यंत मोघणी, बांबू लागवड मधील झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने तालुकाध्यक्ष विकास उगले,सामाजिक कार्यकर्ते सतिष उगले, अंकुश भालेराव यांनी सिंदखेडराजा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना २९ एप्रिल रोजी निवेदनाद्वारे केली आहे. गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे की,सिंदखेडराजा तालुक्यात रोजगार हमी योजना व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजने अंतर्गत विहिरींचे कामे झाली आहेत. परंतु सदर योजनेमधून लाभ मिळवून देण्यासाठी कर्मचारी व कंत्राटी सेवक जिओ टॅगिंगला येण्या अगोदर ५० हजार रुपयांची मागणी करत आहेत. त्यामुळे सदर प्रकाराची गांभीर्याने दखल घ्यावी, तसेच २९ एप्रिल रोजी लाभार्थ्यांकडून कर्मचायांसोबत झालेला आर्थिक व्यवहार उघड होऊ नये, म्हणून त्यांना संबंधीत अधिकारी व कर्मचारी लाभार्थी यांच्यावर दबाव तंत्राचा वापर करून भयभीत करीत आहेत. त्यामुळे सदर प्रकाराचे गांभीर्य लक्षात घेऊन सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच सिंदखेडराजा तालुक्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व रोजगार हमी योजनेमधूने किती विहिरींचा एप्रिल २०२५ पर्यंत लाभ घेतला आहे. त्याची यादी जाहीर करून देण्यात यावी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व रोजगार हमी योजनेतील आज पर्यंत नियमात बसणारे विहिरींच्या लाभार्थ्यांची संख्या किती? याची माहिति द्यावी,आजपर्यंत किती विहिरींचे खोदकाम पूर्ण झाले.अपूर्ण खोदकाम असलेल्या विहिरींची संख्या किती? याची माहिती द्यावी,सदर योजनेमधून खोदलेल्या विहिरी मंजूर केलेल्या गटात खोदल्या आहे का? याचे स्थळ निरीक्षण अहवाल, ७/१२, नकाशा आदी कागदपत्राची सखोल चौकशी करावी, मोघणी लागवड मधील झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यात यावी, रोजगार हमी योजनेचे कार्यालय, कार्यालयीन वेळ आहे. त्यापेक्षा रात्री उशिरापर्यंत का उघडे असते याचा खुलासा करण्यात यावा, सदर योजनेमधील काही लाभार्थ्यांनी व संबंधीत अधिकायांच्या संगनमताने अपूर्ण असलेल्या विहिरी पूर्ण खोदलेल्या दाखवून पूर्ण बिले काढली आहे का? याची देखील सखोल चौकशी करून दोषी अधिकांयावर शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा,अन्यथा अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने जनहितासाठी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.निवेदनाच्या प्रतिलिपी बुलढाणा जिल्हाधिकारी,बुलढाणा जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिल्या आहेत. निवेदनावर क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष विकास उगले, सामाजिक कार्यकर्ते सतिष उगले, अंकुश भालेराव यांच्या स्वाक्षया आहेत.

### नोंदीत बांधकाम कामगारांना उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते गृहोपयोगी साहित्य आणि धनादेश वाटप

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** रत्नागिरीतील स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर नाट्यगृहात सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयामार्फत रत्नागिरी तालुक्यातील नोंदीत बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच, सुरक्षा संच व गृहोपयोगी साहित्य वाटपाचा कार्यक्रम पालकमंत्र्यांच्या हस्ते आज झाला. कार्यक्रमासाठी सुदेश मयेकर, बाबू म्हाप, सहाय्यक कामगार आयुक्त संदेश आयरे आदी उपस्थित होते. यावेळी काही कामगारांना प्रातिनिधिक स्वरुपात उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते गृहोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्ज्वलन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमास लाभार्थ्यांची मोठी गर्दी होती.

### सर्व जातींना समान संधी मिळाल्या का, हे तपासण्यासाठी जातीनिहाय जनगणना गरजेची : डॉ. नीलम गोऱ्हे

#### जातीनिहाय जनगणना निर्णयाचे शिवसेनेतर्फे स्वागत; उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे




**मुंबई :** वेगवेगळ्या जातींना समान पद्धतीने विकासाच्या संधी मिळाल्या का, हे तपासण्यासाठी आणि विशेष संधी सर्वांपर्यंत पोहोचली का, याचे मूल्यमापन करण्यासाठी जातीनिहाय जनगणना गरजेची आहे,'' असे म्हणत विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले.

केंद्र सरकारने नुकतीच जातीनिहाय जनगणना घेण्याचा निर्णय घेतला असून, या निर्णयाचे शिवसेनेतर्फे मनापासून स्वागत करण्यात आले आहे. डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, ''ही जनगणना केवळ आकडेवारीसाठी नसून, देशाच्या सर्वांगीण विकासात प्रत्येक समाजघटकाचा सहभाग आणि त्यांच्या प्रगतीचा आढावा घेण्याची संधी आहे.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समतावादी विचार आणि बाळासाहेब ठाकरे यांचा जातीसंस्थेला विरोध लक्षात घेऊन ही प्रक्रिया राबवली तर, ती वास्तव माहितीच्या आधारे समाजहितासाठी दिशादर्शक ठरेल, असेही त्या म्हणाल्या.

### वेव्हज् परिषदेच्या उद्घाटनासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी १ मे रोजी मुंबईत

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** भारताच्या पहिल्या जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन (वेव्हज) शिखर परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १ मे रोजी मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होणार आहे. या वेव्हज् परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असणार आहे.

''कनेक्टिंग क्रिएटर्स, कनेक्टिंग कंट्रिज'' या घोषवाक्याखाली होणाऱ्या या चार दिवसीय शिखर परिषदेत भारताला मीडिया, मनोरंजन आणि डिजिटल नवप्रवर्तनाचे जागतिक केंद्र म्हणून प्रदर्शित करण्यात येईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि प्रतिभेच्या एकत्रीकरणाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत असलेल्या या वेव्हज् २०२५ मध्ये चित्रपट, ओटीटी, गेमिंग, कॉमिक्स, डिजिटल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, एव्हीजीसी-एक्सआर ब्रॉडकास्टिंग आणि नव्या तंत्रज्ञानाचा समावेश असेल. भारताच्या मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रातील सामर्थ्याचे हे सर्वांगीण प्रदर्शन असेल. या उपक्रमाच्या माध्यमातून २०२९ पर्यंत ५० अब्ज डॉलर्सच्या बाजारपेठेचे दरवाजे उघडले जातील, असा अंदाज आहे.

या शिखर परिषदेत प्रथमच ग्लोबल मीडिया डायलॉग () चे आयोजन मुंबईत होणार आहे. यामध्ये २५ देशांचे मंत्री सहभागी होणार असून, भारताच्या जागतिक मीडिया क्षेत्रातील सहभागात हा एक ऐतिहासिक टप्पा ठरेल. वेव्हज् बजार या जागतिक ई-मार्केटप्लेसमध्ये ६,१०० पेक्षा अधिक खरेदीदार, ५,२०० विक्रेते आणि २,१०० प्रकल्प सहभागी होणार आहेत, ज्यातून स्थानिक व जागतिक स्तरावर व्यवसाय आणि नेटवर्किंगच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या परिषदेत प्रधानमंत्री क्रिप्टोस्पियरला भेट देऊन ''क्रिएट इन इंडिया'' उपक्रमांतर्गत निवड झालेल्या सर्जनशील कलाकारांशी संवाद साधणार आहेत. याशिवाय, ते भारत पॅव्हिलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियनला देखील भेट देतील. या स्पर्धे साठी एक लाखांहून अधिक नोंदणी झाली. वेव्हज् २०२५ परिषदेमध्ये ९० हून अधिक देश, १०,००० प्रतिनिधी, १,००० कलाकार, ३०० हून अधिक कंपन्या आणि ३५० हून अधिक स्टार्टअप्स सहभागी होणार आहेत. शिखर संमेलनात ४२ मुख्य सत्रे, ३९ विशेष सत्रे आणि ३२ मास्टरक्लासेस आयोजित करण्यात येणार आहेत, ज्यामध्ये ब्रॉडकास्टिंग, इन्फोटेन्मेंट, एव्हीजीसी- एक्सआर चित्रपट आणि डिजिटल मीडिया यांसारख्या विविध क्षेत्रांचा समावेश असेल.

# फडणवीस सरकारकडून शेतकऱ्यांवर अन्याय

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषदेत टिका

दैनिक आपला विदर्भ



**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी :** यापूर्वीची पीक विमा योजना लागू करण्यात आली. फडणवीस पॅटर्न समजण्या पलीकडे आहे.पिकविम्याच नाव सांगून बोलावणं केल आहे. हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे. अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली. यावेळी ते पुढे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी बीड पॅटर्न म्हणून योजनेचा कांगावा केला. भ्रष्टाचार करण्याचे मोकाट आहे. चोरांना मोकळली देऊन शेतकऱ्यांच्या तोंडातील घास हिसकावण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. या निर्णयात तातडीने बदल करावा. या निर्णयाचा फटका मराठवाडा, विदर्भाला विशेष होईल. हा अन्याय तातडीने मागे घ्यावा. सरकार येण्यापूर्वी प्रचार करताना शेतकऱ्यांची कर्ज माफी करू, मात्र कर्ज माफी होत नाही. कृषी मंत्र्यांच्या प्रकरण आल्यापासून ते बोलत नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांनी काल बोलायला पाहजे होते. सहाव्या सातव्या क्रमांकर देवेन भारती यांची निवड झाली. निकष डावलून लाडक्या अधिकाऱ्याची निवड केली. सरकार च्या कॉलवर अधिकारी नाचले पाहिजे यासाठी हे सुरू आहे. मागील सरकारमध्ये विरोधी पक्षाच्या नेत्यांचे फोन टॅप करण्यात आले. या अधिकाऱ्यांना फडणवीस सरकारमध्ये प्रमोशन झाले. सरकारच्या या कारभाराचा धिक्कार आम्ही करतो. शेतकऱ्यांच्या नावावर घेतलेलं कर्ज ते शेतकऱ्यांना दिले नाही. सुप्रीम कोर्टाने गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहे. पीक विमा योजना फुल फ्रफ नव्हती. गेल्या २५ वर्षात सुधारणा होत होत्या, त्या करण्याची गरज होती. अधिकारी, पिक विमा कंपनी एजंट गैरफायदा घेत होते. त्या योजनेत भ्रष्टाचार होत होता. मात्र यातील दोषींना पाठिशी घातले जात आहे. आता घेतलेला यू टर्नला आमचा विरोध आहे. पहिल्या योजनेतील दोषांना पांघरून घेण्याकरता सरकार शेतकऱ्यांच्या तोंडातील घास ओढत आहे.१०० दिवसात अका, खोक्या, कोयता गँग, लाडकी बहिण, कर्ज माफी करण्याचा घुमजाव बघायला मिळाला. त्यामुळे १०० दिवसात दिवाळखोरी, गुंडागर्दी, बेरोजगारी बघायला मिळाली आहे.पाणी प्रश्न महत्वाच आहे. गोदावरीच्या पाण्याचा प्रश्न अनेक वर्षापासून आहे. आम्ही पदाधिकाऱ्यांना आंदोलन करण्याचा सूचना देणार आहे.या आधी मनोज जरांगे यांच्या अनेक चर्चा निष्फळ थकल्या आहे. सरकारने भुमिका स्पष्ट करावी. काँग्रेसची अगोदरची भूमिका जी होती ती आहे. जातिनिहाय जनगणना करून ५० टक्के मर्यादा वाढण्याची मागणी आमची आहे .ही आमची राष्ट्रीय भूमिका आहे.ओबीसी आरक्षण हात न लावता, मराठा समाजाला आरक्षण दिले पाहजे. मराठा समाजाला आरक्षण मिळत असले तर स्वागत आहे. भाजप जातिनिहाय जनगणना करण्याच्या विरोधात आहे. यामुळे प्रश्न सुटत नाही. शिंदे फडणवीस गँग ऑफ ट्रिपल सरकार आहे. शिंदे फडणवीस यांच्यात वाद आहे.वडेट्टीवार यांनी खुलासा केला आहे. त्यांनी नंतर भुमिका मांडली आहे. पहलगाम सल्ल्यावरून पक्षीय, धार्मिक सामने खेळले जात आहेत. त्याबाबत खंत व्यक्त करत आहे. बावनकुळे समाज माध्यमांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करतात. मी चार निवडणुका लढलो. ३ जिंकलो. माझा अधिक काळ गेला. माझ्यात कमतरता राहिली. वंचित आघाडीने मतांची विभागणी केली, त्याचा फटका मला बसला आहे. मात्र आघाडीत कार्यरत राहिलो. नागरिक म्हणून आपण राहिलो तर जात धर्म पैसे हे सोडून राहिल पाहजे. सदाभवनेचा रास झाला आहे. आपल्या जातीचा दुकानातून किराणा घेतला पाहजे, इथपर्यंत समाज नेऊन ठेवला आहे. मत भेद असतील मात्र मन भेद नसावेत.असे मत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर भेंडवळची घटमांडणी भाकिताकडे लागले लक्ष

## ३७० वर्षाच्या वर परंपरा आज होणार भाकीत जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जळगाव जामोद तालुक्यातील पूर्णा नदीच्या काठी वसलेल्या भेंडवळ गावात ऐतिहासिक भेंडवळ घट मांडणीतून व्यक्त होणारे भाकिताकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.घटमांडणीची ही परंपरा शेतकऱ्यांसाठी बहु प्रतिक्षित पीक परिस्थिती, पाऊसपाणी त्याचबरोबर सामाजिक, आर्थिक आणि देशाच्या राजकीय परिस्थितीचा अंदाज वर्तवणारी आहे.अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर भेंडवळची घटमांडणी ३० एप्रिल रोजी करण्यात आली आहे.





दुसऱ्या दिवशी १ मे रोजी घट मांडणीतील भाकीत वर्तविण्यात येणार आहेत. या भाकितकडे महाराष्ट्रातील शेतकरी, राजकीय वर्तुळातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

यावर्षी पावसाचे अंदाज काय राहतील, पीक परिस्थितीचा अंदाज, अतिवृष्टी, दुष्काळ, देशाची आर्थिक परिस्थिती, राजकीय भाकीत, पृथ्वीतलावर येणारी संकटे, परकीय शत्रूपासून होणारे धोके अशा अनेक प्रश्नांचे अंदाज घेणाऱ्या भेंडवळ मांडणीच्या भाकिताकडे शेतकऱ्यांचे, राजकीय नेत्यांचे लक्ष लागले आहे. अशातच नुकताच झालेल्या पहलगाम येथील दहशतवादी भ्याड हल्ल्याने भारत पाकिस्तान देशात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे भारत पाकिस्तानचे युद्ध होणार का ? याचा अंदाज घेण्यासाठी भेंडवळ भाकिताकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर ३० एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता ही घट मांडणी करण्यात आली आहे व दुसऱ्या दिवशी १ मे रोजी सकाळी सूर्योदयावेळी त्याचे अंदाज जाहीर करण्यात येणार आहेत. भेंडवळ घट मांडणीला शेकडे वर्षाची परंपरा असली तरी, अंधश्रद्धा निर्मूलन समितीने भेंडवळ गट मांडणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तर दुसरीकडे घटमांडणीला कुठलाही शास्त्रीय आधार नसला तरी, आजही परंपरेनं बळीराजाच्या मनातील महत्त्व कमी झालेले नाही. भेंडवळची प्राचीन घटमांडणी परंपरा विज्ञानाच्या आधुनिक युगातही जपली जात असून, याच भविष्यवाणीविषयी शेतकऱ्यांमध्ये कमालीची उत्सकता पाहायला मिळते. घटमांडणीनंतर वर्तवलेली पाऊस, पीक-पाणी, राजकीय, आर्थिक भाकितं बऱ्याचदा खरी ठरली आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन समितीला निव्वळ ठोकताळे म्हणत असले, तरी शेतकऱ्यांचा भेंडवळ घटमांडणीवर दृढ विश्वास कायम असल्याचा बोलल्या जात आहे.

## विविध वृत्त...

### पहलगाम हल्ल्यात थोडक्यात बचावलेले कृष्णा लोलगे आणि त्यांच्या पत्नी साक्षी लोलगे दांपत्य परतलं नांदेडला



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यातून थोडक्यात बचावलेले नांदेडचे कृष्णा लोलगे आणि साक्षी लोलगे हे दांपत्ये आज नांदेडला परतले. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात निष्पाप २६ पर्यटकांना दहशतवाद्यांनी ठार केल. तर अनेक जण जखमी झाले. तर या हल्ल्यात अनेक पर्यटक थोडक्यात बचावले. नांदेड मधील कृष्णा लोलगे आणि साक्षी लोलगे हे त्यापैकी एक कृष्णा लोलगे आणि त्यांच्या पत्नी साक्षी लोलगे हे जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे गेले होते. दहशतवादी हल्ला झाला, तेव्हा ते काही अंतरावर पहलगाम येथे होते. काही अंतरावरच असलेल्या लोलगे दांपत्य यांनी या घटनेचा थरार माध्यमाना सांगितला.

### अंबरनाथमध्ये अवैधपणे वास्तव्याला असलेल्या ९ बांगलादेशींना अटक



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** अंबरनाथमध्ये अवैधपणे भारतात वास्तव्याला असलेल्या ९ बांगलादेशींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. अंबरनाथ पश्चिम पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

अंबरनाथ पश्चिमेच्या सर्वोदय नगर परिसरातील सृष्टी हिल सोसायटीत मागील ४ वर्षांपासून हे ९ बांगलादेशी अवैधपणे वास्तव्याला होते. याबाबतची माहिती अंबरनाथ पश्चिम पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राजेश गज्जल यांना मिळताच त्यांनी कारवाईचे आदेश देत या ९ बांगलादेशींना बेड्या ठोकल्या. यामध्ये ५ पुरुष आणि ४ महिलांचा समावेश असून त्यांच्या मोबाईलमध्ये सापडलेल्या कागदपत्रांवरून ते बांगलादेशी नागरिक असल्याचं सिद्ध झालं आहे. दरम्यान, ४ वर्षांपासून हे घुसखोर अंबरनाथमध्ये अवैधपणे वास्तव्याला असतानाही अंबरनाथ पोलिसांना मात्र त्यांची माहिती कशी नव्हती? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

### रत्नागिरीतील त्या १३ बांगलादेशीची शिक्षा संपताच मायदेशी पाठवणार; जिल्हा पोलिस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** तालुक्यातील निरूळ येथील चिरेखाणीवर बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या १३ बांगलादेशी नागरिकांना लवकरच त्यांच्या मायदेशी पाठवले जाणार आहे. न्यायालयाने या प्रकरणी दोषी ठरवून त्यांना ठोठावलेली सहा महिन्यांची शिक्षा येत्या १४ मे रोजी पूर्ण होणार आहे. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी, १५ मे रोजी, त्यांना बांगलादेश-भारत सीमेवर सीमा सुरक्षा दलाच्या () ताब्यात देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी दिली आहे.

या १३ बांगलादेशी नागरिकांच्या शिक्षेचा कालावधी १४ मे २०२५ रोजी संपणार आहे. त्यानंतर कोणतीही दिरंगाई न करता, दुसऱ्याच दिवशी त्यांना बांगलादेशात पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. यासाठी आवश्यक असणारी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असून, लवकरच शासकीय परवानगी मिळाल्यानंतर पोलिसांचे एक विशेष पथक या १३ जणांना भारत-बांगलादेश सीमेवर बीएसएफच्या ताब्यात देईल, असे पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

## विशाखापट्टणममध्ये नरसिंह स्वामी मंदिराची भिंत कोसळली, ८ जणांचा मृत्यू

विशाखापट्टणम: आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथील श्री वराहलक्ष्मी नरसिंह स्वामी मंदिरात मोठी दुर्घटना घडली. मंदिर परिसरात २० फूट उंचीची भिंत कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत ८ जणांचा मृत्यू झाला तर ४ जण जखमी झाले आहेत. दरम्यान, दुर्घटनेवेळी चंदनोत्सवम उत्सव साजरा केला जात होता. एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या कर्मचाऱ्यांनी मदत आणि बचाव कार्य हाती घेतलं आहे.

जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलंय : श्री वराहलक्ष्मी नरसिंह स्वामींच्या वार्षिक चंदनोत्सवासाठी शेकडो भाविक सिंहाचलम दिव्य क्षेत्र येथे दाखल झाले होते. यादरम्यान पावसामुळे तिकीट काउंटरजवळील २० फूट लांबीची भिंत कोसळली. या घटनेत ढिगाऱ्याखाली सापडल्यामुळे ८ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. इतर चार जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृतदेह विशाखापट्टणम केजीएच येथे नेण्यात आले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

मदत आणि बचाव कार्य सुरू: मिळालेल्या माहितीनुसार, रात्री अडीचच्या सुमारास ही दुर्घटना झाली.

अक्षय्य तृतीयेनिमित्त मंदिरात चंदनोत्सवम उत्सव सुरू होता. या उत्सवासाठी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. गर्दीच्या दबावामुळे मंदिराचा २० फूट लांब भिंतीचा भाग अचानक कोसळला आणि अनेक लोक ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या घटनेची मिळताच पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. सध्या पोलीस आणि एसडीआरएफ पथकाकडून मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

## जिल्ह्यातील जिहादी ढाचे उद्ध्वस्त केले जातील – नितेश राणे



दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दोडामार्ग तालुक्यात साटेली-भेडशी गावात अनधिकृत असलेल्या मदरशात तलवारी सापडल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यात खळबळ उडाली. त्यासोबत अनधिकृत असलेल्या मदरशात कमी वयोगटातील मुलांना उर्दू व अरबी शिक्षण देत असल्याची माहिती स्थानिकांनी पोलीसांच्या निदर्शनास आणून दिलीय. यावर पोलीसांनी दोन संशयित युवकांना ताब्यात घेतलं असून याबाबत आपण आमच्या जिल्ह्यात जिहादी प्रवृत्ती सहन करणार नाही आणि जिहादयाची वळवळ माझ्या जिल्ह्यात खपून घेणार नाही. मी पोलिसांनी जिल्ह्यातील सगळ्या मदरशावर लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत. अशाप्रकारचे जिल्ह्यातील जिहादी ढाचे उद्ध्वस्त केले जातील. तसेच रस्त्याच्या कामाच्या पलीकडे देखील बुलडोझरचा वापर होतो हे देखील दिसेल, असा इशारा मंत्री नितेश राणे यांनी दिलाय.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, महात्मा बसवेश्वर यांना जयंतीनिमित्त अभिवादन





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, जिल्हा नाझर गजानन मोतेकर यांचेसह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

### पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या २७९५ पदांची भरती; २९ एप्रिलपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होणार


**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागात 'पशुधन विकास अधिकारी' या संवर्गाची २७९५ पदे भरली जाणार आहेत. या पदांसाठी उमेदवारांना २९ एप्रिल २०२५ पासून १९ मे २०२५ पर्यंत आपला अर्ज सादर करता येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे देण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागणीवरून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ या संवर्गातील पदभरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# कर्जमाफीसाठी सिंदखेड राजा येथील उपविभागी कार्यालयावर धडकणार मोर्चा

## ५ में रोजी आयोजित मोर्चात शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यामधील शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, या मागणीसाठी किसान ब्रिगेड, चे सर्वेसर्वा प्रकाश पोहरे यांच्या नेतृत्वाखाली मागेल त्याला, गरज त्यालाच कर्जमुक्ती योजने अंतर्गत कर्जमुक्ती अर्जाची प्रक्रिया सुरू झाली आहे. किसान ब्रिगेड ची संकल्पना ही संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यामध्ये शेतकरी योद्धा कृती समिती बुलढाणा जिल्हा प्रत्येक गावामध्ये पोहोचण्याचे काम करीत असून आत्तापर्यंत पळसखेड चक्का, गोदंनखेड, पिंपळगाव लेंडी, किंनगाव राजा, सिंधी, बाळ समुद्र, सिंदखेडराजा, अशा अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांनी कर्जदार शेतकऱ्यांनी आपले कर्जमुक्तीचे अर्ज भरून घेणे सुरू केले असून शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीचे अर्ज भरून द्यावे, तसेच ५ मे रोजी सिंदखेडराजा उपविभागीय कार्यालय येथे भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन शेतकरी योद्धा कृती समिती बुलढाणा जिल्हा यांनी केले आहे.

राज्यातील राजकीय पक्षांनी नोव्हेंबर २०२४ च्या निवडणुकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, सहा महिने उलटूनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने आणि काही नेत्यांनी कर्ज भरण्याचे आवाहन केल्याने, शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर, लोकनायक शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी कर्जमुक्ती आंदोलन सुरू केले असून, राज्यभरातील शेतकऱ्यांकडून कर्जमुक्ती अर्ज भरून घेतले जात आहेत. सिंदखेडराजा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी शेतकरी मित्र दिलीप चौधरी, शेतकरी योद्धा बालाजी सोसे व गजानन जायभाये यांच्याकडे कर्जमुक्ती अर्ज भरण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. भरलेले अर्ज छत्रपती संभाजी महाराज जयंती दिनी १४ मे रोजी उपविभागी कार्यालय सिंदखेडराजा येथे येथे भव्य मोर्चा काढून हे अर्ज रितसर सरकारला द्यायचे आहे . तसेच आतापर्यंत २०२३ रब्बी खरीप आणि २०२४ खरीप ज्या शेतकऱ्यांना पिक विमा मिळाला नाही किंवा कमी मिळाला आहे.अशा शेतकऱ्यांचा ५ मे रोजी उपविभागीय कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन केले आहे. तरी संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या मोर्चात सामील व्हावे असे आवाहन शेतकरी योद्धा कृती समितीने केली आहे